MHST010030192022

दाखल तारीख – १२.१०.२०२२
नोंदणी तारीख – १५.१०.२०२२
निकाल तारीख – २९.०६.२०२६
कालावधी – वर्ष – महिने – दिवस
०३ – ०८ – १७

<u>मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, सातारा</u>

(अध्यक्ष अरविंद शं. वाघमारे)

<u>मोटार अपघात नुकसान भरपाई मागणी अर्ज क्र. २६८/२०२२</u>

<u>निशाणी क्र.४१</u>

१. **श्री. धनाजी दत्तात्रय कुतवळ,**
वय वर्षे– ४८, धंदा– काही नाही.
२. **सौ. रेखा धनाजी कुतवळ,**
वय वर्षे– ४०, धंदा– घरकाम.
३. **कु. गिरीष धनाजी कुतवळ,**
वय वर्षे– २०, धंदा– शिक्षण.
४. **श्री. दत्तात्रय केशव कुतवळ,**
वय वर्षे– ७५, धंदा– काही नाही.
सर्व रा. मु.पो. चौधरवाडी, ता. फलटण, जि.सातारा.

... **अर्जदार**

विरुध्द

१. **श्री. भानुदास महिपती डोंबाळे,**
वय– सज्ञान, धंदा–व्यापार,
रा. डोंबाळवाडी, ता. फलटण, जि.सातारा.
२. **विभागीय व्यवस्थापक,**
टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कं.लि.,
पत्ता– हॉटेल प्रिती एक्झीक्युटीव्ह,
रहिमतपूर रोड, सातारा.

... **सामनेवाले**

<u>अर्जदारांतर्फे वकील– श्री. एस.डी. भोसले.</u>
<u>सामनेवाला क्र.१ तर्फे वकील – श्री. विरसेन कदम.</u>
<u>सामनेवाला क्र.२ तर्फे वकील – श्री. एस.बी. गोवेकर.</u>

<u>न्यायनिर्णय</u>

(जाहीर दिनांक २९ जून २०२६)

प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी मोटार वाहन कायदा १९९४ चे कलम १६६ अन्वये

मयत मधुरा धनाजी कुतवळ, वय २२ वर्षे हिच्या अपघाती मृत्यूबद्दल रुपये ३९,००,०००/– नुकसानभरपाई मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ व २ हे मयताचे आई–वडील, अर्जदार क्र.३ हा भाऊ आणि अर्जदार क्र.४ हे आजोबा आहेत.

०२. सामनेवाला क्र.१ हे अपघातग्रस्त टिपर ट्रक क्र. एम.एच.१२एम.व्ही.४५७० चे मालक असून अर्जदार क्र.२ ही विमा कंपनी आहे. (येथून पुढे सोईसाठी या वाहनाचा उल्लेख ''सदर ट्रक'' असा करण्यात येईल.)

०३. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक दि.१६.०८.२०२२ रोजी सकाळी ०९.०० च्या सुमारास मयत मधुरा ही स्कुटी क्र.एम.एच.११सी.एफ.७३०४ वरुन प्रवास करत होती. (येथून पुढे सोईसाठी या वाहनाचा उल्लेख ''सदर स्कुटी'' असा करण्यात येईल.) मौजे फलटण, ता.फलटण, जि.सातारा गावच्या हद्दीत फलटण–लोणंद रस्त्यावर नाना पाटील चौक फलटण येथे सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीच्या सदर ट्रकचा चालक सदर ट्रक भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणे चालवित आला व मयत मधुरा प्रवास करत असलेल्या स्कुटीला जोरदार धडक दिली. सदर अपघातात मधुरा ही गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाली. अशाप्रकारे अपघात हा सदर ट्रक चालकाने निष्काळजीपणे वाहन चालविल्यामुळे झालेला आहे.

०४. अपघातावेळी मयत मधुरा हिचे वय २२ वर्षे होते. तिचे शिक्षण बी.सी.एस. पर्यंत झाले होते. ती कर्णे एंटरप्रायजेस, फलटण या कंपनीत संगणक तज्ञ म्हणून नोकरीस होती. तिला दरमहा रुपये १८,५००/– इतका पगार मिळत होता. अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत मधुरा हिच्या उत्पन्नावर अवलंबून होते. या सर्व कारणांसाठी त्यांनी रुपये ३९,००,०००/– नुकसान भरपाईची मागणी केली

आहे.

०५. सामनेवाला क्र.१ यांचेवर नोटीसची बजावणी झाल्यावर ते हजर झाले. परंतु त्यांनी प्रस्तुत अर्जास कैफियत सादर केली नाही. सबब, त्यांच्याविरुद्ध अर्ज विना कैफियत चालणेबाबतचा आदेश पारीत करणेत आला.

०६. सामनेवाला क्र.२ सदर ट्रकची विमा कंपनी यांनी सदर प्रकरणामध्ये हजर होऊन त्यांची कैफियत निशाणी १६ अन्वये दाखल केली असून असे कथन केले आहे की, अपघात हा सदर ट्रक चालकाच्या चुकीमुळे झाला नाही. अपघात हा सदर स्कुटी चालकाच्या चुकीमुळे झालेला आहे. अपघातावेळी सदर स्कुटी चालकाने हेल्मेट घातले नव्हते. अशाप्रकारे अपघातात सदर स्कुटी चालकाचाही सहयोगी निष्काळजीपणा होता. सामनेवाला क्र.२ यांनी मयत मधुरा यांचे वय, व्यवसाय, त्यांचे दरमहा असलेले उत्पन्न, अर्जदारांचे मयतावर असलेले अवलंबित्व इत्यादि गोष्टी अमान्य केलेल्या आहेत व अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाहीत असे नमुद करुन त्यांच्याविरुध्द क्लेम अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०७. माझे पूर्वाधिकारी यांनी अर्जदार व सामनेवाले यांच्या कथना आधारे निशाणी १७ अन्वये मुद्दे निश्चित केले आहेत. त्या वाद प्रश्नांवर त्यालगत माझे निष्कर्ष आणि त्यांची कारणमीमांसा खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

अ.क्र.	मुद्दे.	निष्कर्ष
१	मोटर वाहनांच्या अपघातात मधुरा धनाजी कुतवळ मयत झाल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ?	होय.
२	टिपर ट्रक क्र. एम.एच.१२एम.व्ही.४५७० च्या चालकाने भरधाव व बेदरकारपणे ट्रक चालविल्याने	

	अपघात झाल्याचे अर्जदार सिध्द करतात काय?	होय.
३	अपघातात मयताचा सहयोगी निष्काळजीपणा असल्याचे सामनेवाला क्र.२ सिध्द करतात काय?	नाही.
४	अर्जास आवश्यक पक्षकार सामिल नाहीत या तत्वाची बाधा येत असल्याचे सामनेवाला क्र.२ सिध्द करतात काय?	नाही.
५	विमा पॉलीसीमधील अटी व शर्तींचे पालन न केल्याने अर्जदारांना नुकसानभरपाई देण्यास बांधील नसल्याचे सामनेवाला क्र.२ सिध्द करतात काय?	नाही.
६	अर्जदार हे मागितलेल्या नुकसान भरपाईची रक्कम मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती व कोणाकडून ?	होय. अंतिम आदेशाप्रमाणे.
७	आदेश काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे.

कारणमीमांसा

०८. अर्जात केलेली विधाने सिद्ध करण्यासाठी अर्जदार यांच्यातर्फे खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर करणेत आला.

१	प्रथम वर्दि अहवाल.	नि. २१
२	घटनास्थळ पंचनामा.	नि. २२
३	मरणोत्तर पंचनामा.	नि. २३
४	शवविच्छेदन अहवाल.	नि. २४
५	आर. सी. बुक.	नि. २५
६	विमा पॉलीसी.	नि. २६

७	कर्णे एंटरप्रायजेसचे नोंदणी प्रमाणपत्र.	नि. ३३
८	शासनाचे प्रमाणपत्र.	नि. ३४
९	प्रमाणपत्र.	नि. ३५
१०	पगाराचा दाखला.	नि. ३६.

०९. अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र.१ धनाजी दत्तात्रय कुतवळ यांनी निशाणी १८ अन्वये पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. तसेच साक्षीदार क्र.२ जितेंद्र माणिकराव कर्णे यांचा जबाब निशाणी ३० अन्वये नोंदविला आहे.

१०. अर्जदार यांनी सादर केलेला पुरावा खोडून काढण्याकरीता सामनेवाला यांनी कोणताही साक्षीदार तपासला नाही.

११. अर्जदारांचे विधीज्ञ श्री. एस.डी. भोसले, सामनेवाला क्र.२ यांचे विधीज्ञ श्री. एस.बी. गोवेकर यांचा युक्तीवाद ऐकला.

१२. अर्जदार यांचेतर्फे खालीलप्रमाणे न्यायनिर्णय प्रस्तुतकामी सादर करण्यात आले.

1) *Ram Vishal Gupta Vs. Shokeen, LAWS(DLH)2019-9-390.*
2) *New India Insurance Co.Ltd. Vs. Vasantrao s/o Laxman Wanmali, LAWS(BOM)2024-6-220.*
3) *Magma General Insurance Co. Ltd. Vs. Nanu Ram Alias Chuhru Ram & ors., LAWS(SC)2018-9-51.*
4) *Special Leave Petition(Civil) No.33915/2025(SC)Judgment .*

मुद्दा क्रमांक १ ते ७ –

१३. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रीतपणे चर्चेला घेतले आहेत.

१४. अर्जदार क्र.१ धनाजी दत्तात्रय कुतवळ यांनी स्वतःला शपथेवर निशाणी १८ अन्वये तपासून तोंडी पुरावा दिला आहे. त्यांच्या अर्जातील कथने व त्यांचा तोंडी पुरावा याचे एकत्रीतरित्या वाचन करता असे दिसून येते की, त्यांची मुलगी मयत मधुरा ही सदर स्कुटीने प्रवास करत असताना मौजे फलटण, ता.फलटण, जि.सातारा गावच्या हद्दीत फलटण–लोणंद रस्त्यावर नाना पाटील चौक फलटण येथे सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीच्या सदर ट्रकचा चालक सदर ट्रक भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणे चालवित आला व मयत मधुरा प्रवास करत असलेल्या स्कुटीला जोरदार धडक दिली. सदर अपघातात मधुरा ही गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाली.

१५. सदरचा पुरावा हा सामनेवाला क्र.२ यांनी उलटतपासाद्वारे आव्हानीत केला आहे. अपघातावेळी ते स्वतः हजर नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. अपघात हा मयत मधुरा हिच्या चुकीमुळे झाला या सूचनावजा प्रश्नास अर्जदार क्र.१ यांनी नकारार्थी उत्तर दिले आहे. तसेच अपघातावेळी मयत मधुरा स्कुटीवरुन हेल्मेट न घालता प्रवास करत असल्याचे त्यांनी कबुल केले आहे.

१६. सदर अपघाताची खबर मुकेश कुंडलिक बर्गे यांनी दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरुन पोलीसांनी सदर ट्रक चालकाविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३०४(अ) अन्वये गुन्हा दाखल केल्याचे दिसून येत आहे. तसेच पोलीसांनी दि. १६.०८.२०२२ रोजी अपघातस्थळास भेट देऊन निशाणी २२ कडील पंचनामा केलेला दिसून येत आहे.

१७. सदर प्रकरणामध्ये सदर ट्रक हे वाहन सदर स्कुटी पेक्षा जड वाहन आहे. अशा वेळी जड वाहनाच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन काळजीपूर्वक चालविणे अभिप्रेत असते. जर सदर ट्रक चालकाने आपली

जबाबदारी व्यवस्थीतरित्या पार पाडली असती तर अपघाताची बाब टळू शकली असती. याउपर येथे असे नमुद करणे आवश्यक आहे की, सदर अपघात हा मयत मधुरा व सदर ट्रक चालक यांच्या माहितीतील होता. सबब, सदर ट्रक चालक हे सुध्दा सदर अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. परंतु सदर ट्रक चालक यांना सामनेवाला क्र.२ यांनी साक्षीदार म्हणून तपासले नाही.

१८. गुन्ह्याची पहिली वर्दि (निशाणी २१) मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर अपघातामध्ये मयत मधुरा हिस गंभीर जखमा होऊन तिचा मृत्यू झाला आहे. तसेच मरणोत्तर पंचनामा (नि.२३) आणि शवविच्छेदन अहवाल (नि.२४) मध्ये मयत मधुरा हिस रस्ते अपघातात विविध जखमा होऊन तिचा मृत्यू झाल्याचे दिसून येत आहे. वर चर्चा केल्याप्रमाणे सदर अपघात हा सदर ट्रक चालकाच्या चुकीने झाल्याचे सिद्ध होते. सबब, सामनेवाला क्र.२ यांच्या विधीज्ञांनी युक्तीवादात कथन केल्याप्रमाणे प्रस्तुतचा अपघात मयत मधुरा हिच्या सहयोगी निष्काळजीपणामुळे झाल्याचे सिद्ध होत नाही.

१९. आता असा प्रश्न उपस्थित होतो की, अर्जदार यांनी मागितलेली नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास किती व कोणाकडून? अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे मयत मधुरा हिचे वय अपघातावेळी २२ वर्षे होते. हे दाखविण्यासाठी त्यांनी कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. निशाणी २३ कडील मयताचा पचंनामा आणि निशाणी २४ कडील शवविच्छेदन अहवालामध्ये मयत मधुरा हिचे वय २२ वर्षे इतके नमुद आहे. त्यामुळे अपघातावेळी तिचे वय वर्षे २२ होते हे लक्षात घ्यावे लागते. माननीय सर्वोच्च न्यायालयाचे ***सरला वर्मा वि।। दिल्ली ट्रान्स्पोर्ट कं. व इतर, २००९(२) टीएसी ६७७*** या न्यायनिर्णयातील निरिक्षणानुसार वयोगट २१ ते २५ साठी "१८'' हा गुणांक या प्रकरणामध्ये लागू होतो.

२०. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, मयत मधुरा हिचे शिक्षण बी.सी.एस. पर्यंत झाले होते. ती कर्णे एंटरप्रायजेस, फलटण या कंपनीत संगणक तज्ञ म्हणून नोकरीस होती. तिला दरमहा रुपये १८,५००/– इतका पगार मिळत होता. ही बाब सिध्द करण्यासाठी त्यांनी निशाणी ३७ अन्वये कर्णे एंटरप्रायजेस चे मालक श्री. जितेंद्र माणिकराव कर्णे यांचा जबाब नोंदविला आहे. त्यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, मयत मधुरा धनाजी कुतवळ ही त्यांच्याकडे सन २०२१ पासून संगणक तज्ञ म्हणून नोकरीस होती. ते मयत मधुरा हिस दरमहा १८,५००/– इतका पगार देत असल्याचे त्यांनी कथन केले आहे. निशाणी ३६ कडे दाखल केलेल्या पगाराच्या दाखल्यान्वये ते मयत मधुरा हिस दरमहा रुपये १८,५००/– इतका पगार असल्याचे दिसून येते. सामनेवाला क्र.२ तर्फे घेणेत आलेल्या उलटतपासात या साक्षीदाराने कर्मचाऱ्यांच्या पगाराची व हजेरीची नोंद ठेवली नसल्याचे, मयत मधुरा हिस दरमहा रुपये १८,५००/– इतका पगार देत असल्याचे आयकर विवरणपत्रात नमुद केले नसल्याचे, तसेच मयत मधुरा ही त्यांच्याकडे कामास असल्याचे दाखविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा त्यांच्याकडे नसल्याचे मान्य केले आहे.

२१. अर्जदारांच्या विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान मयत मधुरा हिच्या मासिक उत्पन्नाच्या गणणेसाठी नामदार उच्च न्यायालय, दिल्ली यांचेकडील ***राम विशाल गुप्ता वि।। शोकीन, लॉज (DLH)२०१९–९–३९०*** आणि नामदार सर्वोच्च न्यायालय यांचेकडील ***शिशु पाल उर्फ शिष राम व इतर वि।। सुरजीत व इतर, स्पेशल लिव पिटीशन(सिव्हील) ३३९१५/२०२५*** या न्यायनिर्णयाची प्रत दाखल करुन कथन केले की, मयत मधुरा हिच्या मासिक उत्पन्नाची गणना करताना या न्यायनिर्णयांमधील निर्देश विचारात घेणेत यावेत. नामदार उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांच्या निकषांचा आदर करुन येथे नमुद करावेसे वाटते की, सदर न्यायनिर्णयातील तथ्ये आणि परिस्थिती आणि प्रस्तुत प्रकरणातील तथ्ये व

परिस्थिती वेगळी आहे. तसेच अर्जदारांनी "कौटुंबिक सेवांचे नुकसान'' या स्वतंत्र शिर्षाखाली प्रस्तुत प्रकरणी मागणी केलेली नसल्याने या न्यायनिर्णयातील निर्देश येथे लागू करणे न्यायोचित वाटत नाही.

२२. सामनेवाला क्र.२ च्या वकीलांनी युक्तिवादादरम्यान मयत मधुरा यांचे काल्पनीक उत्पन्न दरमहा रुपये ८,०००/– इतके गृहित धरावे असे कथन केले. वरीलप्रमाणे सर्व बाबी विचारात घेता मयत मधुरा उदरनिर्वाहासाठी नोकरी करत होती व तिचे दरमहा पगारापासूनचे उत्पन्न रुपये १८,५००/– होते असे ठामपणे म्हणता येणार नाही. तथापी, मयत मधुरा ही उदरनिर्वाहासाठी काही ना काही काम नक्कीच करत असणार. सबब, तिचे पगारापासूनचे दरमहाचे काल्पनीक उत्पन्न रुपये १५,०००/– इतके गृहित धरावे लागेल.

२३. अर्जदारांच्या कथनांप्रमाणे अर्जदार क्र.१ व २ हे मयताचे आई–वडील, अर्जदार क्र.३ हा भाऊ आणि अर्जदार क्र.४ हे आजोबा असून ते मयत मधुरा हिचेवर अवलंबून होते. सामनेवाला क्र.२ च्या विधीज्ञांनी युक्तिवादादरम्यान कथन केले की, अर्जदार क्र.१ व २ हे आई–वडील या नात्याने मयत मधुरा हिचेवर अवलंबून होते. परंतु, सामनेवाला क्र.३ भाऊ आणि सामनेवाला क्र.४ आजोबा असल्याने ते मयत मधुरा हिचेवर अवलंबून नव्हते. हा मुद्दा खोडून काढण्यासाठी अर्जदारांतर्फे वर नमुद अ.क्र.२ कडील न्यायनिर्णय सादर करणेत आला. या न्यायनिर्णयातील निकषांप्रमाणे अर्जदार क्र.३ हा मयताचा भाऊ असून तो अविवाहीत असल्याने तसेच अर्जदार क्र.४ हे आजोबा या नात्याने मयत मधुरा हिचेवर अवलंबून असल्याचे नाकारता येणार नाही.

२४. मयत मधुरा हिच्यावर अर्जदार क्र.१ ते ४ अवलंबून असल्याने मयताच्या वैयक्तीक खर्चाकरीता १/३ रक्कम वजा करणे योग्य ठरते. मयत मधुरा

नोकरी करत असल्याने तिचे नोकरीपासूनचे उत्पन्न विचारात घेणेत आले आहे. सबब, वर चर्चा केल्याप्रमाणे अपघात समयी मयत मधुरा हिचे वय २२ वर्षे असल्याने ***नॅशनल इंशुरंस कं.लि. विरुध्द प्रणय सेठी, २०१७ ए.सी.जे.२७००*** या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालपत्रातील निर्देशाप्रमाणे मयताचे भविष्यातील उत्पन्नाची वाढ ५० टक्के विचारात घ्यावी लागेल. तसेच मयताचे वयानुसार १८ चा गुणांक लागू होईल.

२५. वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदार हे खालीलप्रमाणे नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

१.	मयताचे वार्षीक उत्पन्न १२ x १५,०००/-	रुपये १,८०,०००/-
२.	भविष्यातील उत्पन्नाची वाढ ५० टक्के. (रुपये १८०००० + ९००००)	रुपये २,७०,०००/-
३.	मयतावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या ४ असल्यामुळे मयताचा वैयक्तीक खर्च १/३ वजा करता मिळणारे उत्पन्न, वजा करता अर्जदाराची अवलंबीत्वाची रक्कम.	रुपये २,७०,०००/- वजा रु.९०,०००/- (रु.१,८०,०००/-)
४.	मयताचे वयाचा विचार करता उत्पन्नाची हानी निश्चित करण्यासाठी गुणांक १८ ने गुणून उत्पन्नाची अवलंबित्वाची रक्कम. (रुपये १,८०,०००/-x १८)	रु. ३२,४०,०००/-
५.	लॉस ऑफ कंसोरटिअम (सहवासाचे नुकसान) (दि.३१.१०.२०१७ पासून रुपये ४०,०००/- वर दर ३ वर्षांनी १० टक्के वाढीसह येणारी र.रु. ४४,००० x ४.)	रुपये १,७६,०००/-
६.	लॉस ऑफ इस्टेट (संपत्तीचे नुकसान) व अंत्यविधी या करीता खर्च एकत्रीतपणे रुपये ३०,०००/-. (दि.३१.१०.२०१७ पासून रुपये ३०,०००/- वर दर ३ वर्षांनी १० टक्के वाढीसह येणारी र.रु. ३३,०००/-)	रुपये ३३,०००/-
	नुकसान भरपाईची अंतिम रक्कम. (अ.क्र.४ ते ६)	**रु. ३४,४९,०००/-**

२६. सामनेवाला क्र.१ यांनी सामनेवाला क्र.२ यांचेकडे सदर ट्रकचा विमा दि.२८.०५.२०२२ ते २७.०५.२०२३ या कालावधीकरीता उतरविला होता. अपघात दि.१६.०८.२०२२ रोजी झाला असल्याने अपघात समयी विमा पॉलीसी वैध होती. अर्जदार क्र.१ व २ यांना मयत मधुरा धनाजी कुतवळ हिच्या अपघाती मृत्यूबाबत वरीलप्रमाणे विविध तपशिलांसाठी नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी सामनेवाला क्र.१ च २ यांची वैयक्तीक व संयुक्तिक आहे. अर्जदार हे वरील रकमेवर अर्ज दाखल तारखेपासून द.सा.द.शे. ८ टक्के दराने व्याज मिळण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र. १, २ व ६ चे उत्तर "होय"' आणि मुद्दा क्रमांक ३ ते ५ चे उत्तर "नाही" असे नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्जदार यांचा मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज खर्चासह अंशतः मंजुर करणेत येतो.

२. सामनेवाला क्र.१ व २ हे वैयक्तीक व संयुक्तीकरित्या अर्जदार क्र.१ व २ यांना अंतरीम नुकसानभरपाईच्या रकमेसह एकूण नुकसान भरपाई रक्कम रुपये ३४,४९,०००/- (रक्कम रुपये चौतीस लाख एकोणपन्नास हजार फक्त) व त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत द.सा.द.शे.८ टक्के व्याज दराने देण्यास बांधील आहेत.

३. सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदारांना देण्याकरीता वरील रक्कम वाहन अपघात दावा न्यायाधिकरण यांचे बँक खाते क्रमांक ४०८२७५२६३३३, IFSC कोड क्र. SBIN-0010713 मध्ये जमा करावी.

४. नुकसान भरपाईच्या व्याजासह येणाऱ्या एकूण रकमेपैकी अर्जदार क्र.१ ते ३ यांना प्रत्येकी ३० टक्के आणि अर्जदार क्र.४ यांना १० टक्के रक्कम देण्यात यावी.

५. अर्जदार क्र.१ ते ३ यांचे हिश्श्यास येणाऱ्या रकमे पैकी ५० टक्के

रक्कम त्यांच्या पसंतीच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत तीन वर्षांच्या मुदत ठेवीने ठेवणेत यावी. मात्र ठेवीवरील मासिक अथवा त्रैमासिक व्याज त्यांच्या इच्छेनुसार घेण्याची त्यांना मुभा राहील. अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या हिश्श्याची उर्वरीत रक्कम त्यांच्या बँक खात्यात ऑन लाईन पध्दतीने वर्ग करण्यात यावी.

६. अर्जदार क्र.४ यांच्या हिश्श्याची व्याजासह रक्कम त्यांच्या बँक खात्यात ऑन लाईन पध्दतीने वर्ग करण्यात यावी.

७. अर्जदार क्र.१ ते ४ यांनी नुकसान भरपाईची रक्कम वर्ग करण्यासाठी त्यांचा बचत खाते क्रमांक, पॅन क्रमांक आणि आधार क्रमांक सादर करावा.

८. मुदतीपूर्वी सदर रक्कम या न्यायाधिकरणाचे पूर्व परवानगीशिवाय परत करणेत येवू नये.

९. अर्जदार यांनी अदा केलेले न्यायीक शुल्क कमी असल्यास, कमी असलेले न्यायीक शुल्क अर्जदार यांनी १५ दिवसांत अदा केल्यानंतर आदेश अंमलात येईल. न्यायीक शुल्क देण्यास विलंब झाल्यास आदेशाच्या तारखेपासून न्यायीक शुल्काची रक्कम अदा करे पर्यंतच्या कालावधीत नुकसान भरपाईच्या रकमेवर व्याज मिळण्यास अर्जदार पात्र राहणार नाहीत.

१०. येणेप्रमाणे अंतिम हुकुमनामा करणेत यावा.

ARVIND WAGHMARE

Digitally signed by ARVIND WAGHMARE
Date: 2026.06.29 17:15:56 +0530

(अरविंद शं. वाघमारे)

दि. २९ जून २०२६

अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
सातारा.